**(दिनांक २३ डिसेंबर २०२२)**

# जागतिक शेतकरी दिनाच्या निमित्ताने जगाच्या पोशिंद्याला मानाचा मुजरा



श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी व प्रशिक्षणार्थ्यांनी राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा केला. वडाळा, उत्तर सोलापूर येथील शेतकरी माननीय श्री चरणसिंह जालिंदर गायकवाड यांना लोकमंगल समूहाच्या वतीने महाराष्ट्राचे आराध्य श्री विठू माऊलीच्या मूर्तीचे स्मृतीचिन्ह भेट म्हणून देण्यात आले व एक शेतकरी म्हणून शेतकरी दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कामाचा गौरव करण्यात आला.

"स्वत:च्या रक्ताचं पाणी करुन संपूर्ण जगाच्या भूकेसाठी राबणाऱ्या जगाच्या पोशिंद्याला मानाचा मुजरा करण्यासाठी “राष्ट्रीय शेतकरी दिवस" साजरा केला जातो. लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली निदेशक श्री बाळासाहेब जाधव सर यांनी या कार्यक्रमाची रूपरेषा तयार केली तसेच या कार्यक्रमाला श्री संभाजी जाधव सर, राहुल गवळी सर,श्री रणजीत गाडे सर, श्री सौरभ दहिटनकर सर, श्री लवटे सर, श्री विटकर सर आणि लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी कार्यक्रम स्थळी उपस्थित होते.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशीतील मोठी लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहे. मात्र अन्न उत्पादनासाठी शेतकऱ्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे

लागते. खरेतर आपण शेतकऱ्यांचे दररोज आभार मानले पाहिजेत. प्रत्येक देशवासीयाला त्यांच्या निस्वार्थ योगदानामुळे अन्न पुरवले जाते. शेतकऱ्यांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस भारतीय शेतकरी दिन म्हणून साजरा केला जातो.

माजी पंतप्रधान आणि शेतकरी मित्र नेते चौधरी चरण सिंह यांची आज जयंती आहे. स्वर्गीय चौधरी चरणसिंग यांनी भारताचे पंतप्रधान असताना शेतकऱ्यांची स्थिती व दिशा सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले. चौधरी चरण सिंह हे स्वतःदेखील शेतकरी कुटुंबातून आले होते. त्यामुळेच त्यांना शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या समस्यांची जाण होती. देशातील सर्वोच्च पदावर विराजमान होऊनही त्यांनी शेतकऱ्यांसाठी सुधारात्मक कार्य सुरूच ठेवले. चौधरी चरणसिंग यांनी भारत शेतकऱ्यांचा देश असल्याचे ओळखले होते. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. कृषी क्षेत्राच्या विकासात आणि शेतकऱ्यांच्या हिताचे हे सर्व कायदे आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. कृषी उत्पादने, बाजार, त्यांना सावकारांच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी कायद्यांची तयारी केली.